25

# दारिद्र्य रेषेखालील लोकांचे जीवन एक आव्हान

**सहाय्यक.प्रा.डॉ. आशा एन. गिते**
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय
लोकप्रशासन विभाग प्रमुख
मुखेड जि. नांदेड

**सहाय्यक प्रा. सिध्देश्वर शिवमुर्ती कोळळे (स्वामी)**
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय
समाजशास्त्र विभाग प्रमुख
मुखेड जि. नांदेड

**भा**रत हा कृषिप्रधान देश आहे. या देशातील ७० % लोक ग्रामीण भागात राहतात. देशात सुमारे ५ लाख ७० हजार खेडी आहेत. देशातील ७० % लोक शेती आणि शेतीवर पूरक व्यवसायावर अवलंबून आहेत. तसेच भारतीय अर्थव्यवस्था शेतीवर आधारीत आहे. शेती व्यवसाय इतर व्यवसायापेक्षा निसर्गावर आधारीत असून अधिक श्रमाचा आहे.

मानवी जीवनात अर्थ हा एक महत्वाचा घटक मानला जातो. त्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण ह्या मूलभूत गरजाची पूर्तता झाली म्हणजे माणूस सुखी होतो. परंतू भारतात श्रीमंत, मध्यम, गरीब, आदिवासी तसेच दारिद्र्य रेषे खालील लोकांचे जीवन एक आव्हानात्मक सामाजिक व आर्थिक समस्याचा विचार सामाजिक संशोधनाचा शोध निबंध लिहिताना भारतीय अर्थ व्यवस्थेतील असमतोल हे ६५ वर्षा नंतर ही देशाने विज्ञान-तंत्र ज्ञानाच्या प्रगतीत समस्यात्मक चिंतन हा सामजिक सत्य संशोधनाचा व चिरंतन सत्याचा शोध घेणे भारतीय कुटूंबाचे सामाजिक, आर्थिक विकासाच्या सर्वेक्षणात होणार आहे. सर्वात महत्वाची गोष्ट अशी की, या माहितीच्या आधारे भारतातील गरीब कोण हे ठरणार आहे. पूर्वी १९९७ मध्ये व नंतर २००२ मध्ये दारिद्र्य रेषे खालील कुटूंबे नक्की करण्यासाठी सर्वेक्षण झाली आहेत.

थोडक्यात ही सर्व माहिती घेऊन काही विशिष्ट निकष लावून गरीब कोण हे अर्थ शास्त्रज्ञाच्या व्यक्तीला मिळणाऱ्या अत्यल्प उत्पादनामूळे निर्माण होते. उत्पन्न कमी असल्यामुळे व्यक्ती आपल्या आवश्यक गरजाची पूर्तता करू शकत नाही. यातून समाजात असमानता निर्माण होते. दारिद्र्य ही एक सामाजिक प्रक्रिया आहे. दरिद्री व्यक्ती म्हणजे समाजातील अशा व्यक्ती ह्या दैनंदिन जीवनातील किमान उपभोगाच्या गोष्टी प्राप्त करण्यास असमर्थ असतात. सर्व अल्प विकसीत देशात जेथे दरडोई उत्पन्न इ.स. १९८४-१९८५ मध्ये दारिद्र्य रेषेनुसार ग्रामीण क्षेत्रात दरमहा दरडोई १०७ रूपये व शहरी क्षेत्रात १२२ रूपये असा खाण्यावरील खर्च निश्चित करण्यात आला. ग्रामीण भागात पाच सदस्यीय कुटूंबाचा दरवर्षाच्या खाण्यावरील खर्च ६४२० तर शहरी भागातील पाच सदस्याच्या कुटूंबाचा खाण्यावरील खर्च ७३२० रूपयापेक्षा कमी असेल तर त्याचा समावेश दारिद्री कुटूंबात करण्यात आला.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून दारिद्र्याची निश्चिती समाजात प्रचलित असणाऱ्या नियमाद्वारे होते. मिलर व रोबी यांच्यामते दारिद्र्याला स्पष्ट स्वरूपात असमानता मानले आहे. ती दारिद्री लोकांच्या जीवनाची दशा आणि जिवंत राहण्याच्या संधीवर उत्पन्नाच्या पडणाऱ्या प्रभावाचे स्पष्टिकरण करते. आत्यंतिक निर्धनता ही दरिद्री लोकांच्या हातात पैसे ठेवून कमी करता येईल अगर संपूष्टातही आणता येईल. पण असमानतेचे समाधान व्यक्तींना एका विशिष्ट रेषेवर आणूनही करता येणार नाही.

जगातील सर्वच देशात कमी-अधिक प्रमाणात दारिद्र्याचा प्रश्न भेडसावतो. परंतू विकसित देशातील दारिद्र्य हे सापेक्ष दारिद्र्य असल्याने ती समस्या गंभीर नाही. भारतात निरपेक्ष दारिद्र्याची समस्या आहे.

**दारिद्र्याचा अर्थ -**

प्रत्येक व्यक्तीला जिवंत राहण्यासाठी किंवा जीवन जगण्यासाठी काही आवश्यक गरजांची पूर्ती होणे महत्वाचे आहे. मोटर, स्कुटर, फ्रीज, टी.व्ही., फोन या गोष्टी आवश्यक आहेत परंतु या वस्तु जीवनाश्यक नाहीत. आपल्या जीवनाचा एक न्युनतम स्तर टिकवून ठेवण्यासाठी व्यक्तीला अन्न, वस्त्र, निवारा या गोष्टी आवश्यक असतात. जेव्हा व्यक्ती त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांच्या या आवश्यक गरजांची पूर्तता होत नाही व्यक्तीचा जीवनस्तर न्युनतम जीवन स्तरापेक्षा खाली जातो. या अवस्थेस दारिद्र्य असे म्हणतात.

गरीबी रेषेसाठी किमान जीवनस्तर पातळीचा आधार घेतला जातो. व्यक्तीला जिवंत राहण्यासाठी किमान उष्माकांची आवश्यकता असते. त्यामुळे हा आधार मानला जातो.

१) आवश्यक उष्मांक आधारावर - योजना आयोगनुसार किमान जीवन जगण्यासाठी २४०० उष्मांक Calories ग्रामीण भागात तर शहरी भागात २१०० उष्मांक.

२) आवश्यक उत्पन्न आधारावर इ.स. १९७३-७४

अ) ग्रामीण भागात प्रतिव्यक्ती, प्रतिमहिना ४९.१० रू.

ब) शहरी भागात प्रतिव्यक्ती, प्रतिमहिना ५६.६० रू.

आधारावर गरीबी रेषा ठरविण्यात आली.

३) राष्ट्रीय नमूना सर्वेक्षणाच्या ५५ फेरी नुसार इ.स. १९९३-९४ ग्रामीण भागासाठी प्रतिव्यक्ती प्रति महिना २२८.९० रू. शहरी भागात प्रतिव्यक्ती प्रतिमहिना २६४.१० रू. या आधारावर गरीबी रेषा ठरविण्यात आली.

४) केंद्रिय योजना आयोग २००१-२००२ ग्रामीण भागात प्रतिव्यक्ती प्रतिमहिना ३३१.४० रू. शहरी भागात प्रतिव्यक्ती प्रतिमहिना ४२५.७६ रू. गरीबी रेषा ठरविण्यात आले.

**गृहितके :**

१) भारतातील दारिद्र्य सामाजिक व आर्थिक चिंतनाची असमानतेची बहुआयामी संकल्पना आहे.

२) मानवी जीवनातील अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य गरजाच्या निवारणार्थ बहुजन हिताय, बहुजन सुखाय याचा शोध घेण्याचा प्रयत्न होय.

३) किमान पातळीवरील जीवन हे जगण्याच्या दृष्टिने उच्चतम विकासाच्या व राष्ट्राच्या विकासाच्या उभारणीत दारिद्र्य रेषेचे प्रमाण वाढविणे साठी सर्वे सर्व क्षेत्रातील योजना योगदान देणे ही काळाची गरज आहे.

**तथ्यसंकलन :**

प्रस्तूत शोध निबंधासाठी द्वितीयक स्त्रोताचा वापर केलेला आहे. विविध ग्रंथ, शासकीय मासिके, वर्तमान पत्र, पुस्तके याचा आधार घेतलेला आहे.

**उद्दिष्ट्ये :**

१) मानवी जीवनातील निम्न पातळीचा कल्याणात्मक, सुधारात्मक, संरक्षणात्मक, मुक्तीचा विचार व मानवतेचे सत्य व अभ्यासमय स्वरूपाचे ज्ञान प्राप्त करणे.

२) भारतीय दारिद्र्याचे विकासात्मक, योजनाचे प्रभाव समाजावर रूजविण्याचे प्रयत्न करणे.

३) मानवी हक्क व सामाजिक न्यायाच्या विचाराच्या योगदानातून मानवतावाद मानवी कल्याणातील राष्ट्रीय सुरक्षितेतील समन्वय साधणे.

**विश्लेषण :**

भारत हा सुजलाम सुफलाम देश आहे. डॉ. बी.एस. मिन्हास यांनी म्हटले आहे की, भारतीय ग्रामीण अर्थ व्यवस्थेतील असमतोल चे स्वरूप बदलावयाचे असेल तर शेती आणि शेतकऱ्याचे समस्या जाणून घेवून त्या सोडविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजे.

प्रसिध्द विचारवंत ऑल्विन टॉफलर म्हणतो.. आपल्या थर्ड लेव्ह (तिसरी लाट) या पुस्तकात मानवी संस्कृतीच्या तीन लाटाचे वर्णन केले आहे. पहिली लाट कृषिप्रधान संस्कृती, दुसरी लाट औद्योगिक संस्कृती व तिसरी लाट अर्थ व्यवस्था समाजातील जीवन

जगणाऱ्या दारिद्र्य रेषेतील लोकांचे (निम्नस्तर) असमतोलाची मानवी संस्कृती येत आहे ती विकासाच्या दृष्टीने जाणीव जागृतीकडे लक्ष देणे काळाची गरज आहे.

नागरिकांना जेव्हा त्याच्या जीवनावश्यक गरजाची पूर्तता करणे शक्य होत नाही तेव्हा तो दारिद्र्यात जीवन जगतो असे म्हटले जाते. याचा अर्थ त्यास स्वत: व कुटूंबाच्या किमान गरजांची पूर्तता करण्या इतके उत्पन्न प्राप्त होत नाही. याच अर्थाने एखाद्या देशात समाजाचा असा एक नागरिकांचा मोठा वर्ग जो आपल्या जीवनाश्यक गरजाची पूर्तता करण्यास हतबल होतो त्यास दारिद्र्य म्हणणे संयुक्तिक होईल.

मार्टिन रीन यांनी उपयुक्त वादावर आधारीत अभ्यास केला या शिवाय अर्थ शास्त्रज्ञाचा अभ्यासगट ओझा यांचे विश्लेषण, वि.म. दांडेकर व नीलकंठ रथ यांचा अभ्यास श्रीवर्धन यांचा अंदाज, मुखर्जी भट्टाचार्य आणि चटर्जी यांचे विश्लेषण, मिन्हास यांचा अंदाज, डॉ. अमर्त्य सेन यांचे मत, भारतीय नियोजन मंडळ यांच्या मते, व्यक्तीच्या पोषणासाठी आवश्यक असलेले किमान उष्मांक व इतर जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करण्यासाठी जो किमान खर्च अपेक्षीत असतो ती दारिद्र्य रेषा होय. यापेक्षा कमी खर्च करू शकणारी व्यक्ती दारिद्र्य रेषेखाली असते म्हणजे गरीब असते.

तेंडूलकर समितीने विशेष शिफारस सरकारने मान्य केले आहे ते गरीब कोण ठरवण्याच्या या प्रक्रियेत कोण गरीब नाही ? पहिला टप्पा ठरविण्याचे १३ निकष निश्चित करण्यात आले. दुसरा टप्पा गरीबीचे निकष ठरविले ते ५ निकष, बेघर असलेले कुटूंब, निराधार व भीक मागणारे कुटूंब, डोक्यावर मैला वाहून नेणारे कुटूंब, आदिम जमातीतील कुटूंब, व कायद्याने मुक्त झालेले वेठ बिगार कुटूंब, तिसरा टप्पा हा वंचित तेचे ७ निकष ठरविलेले आहेत.

विश्व बँकेने १९८१ च्या आपल्या विकास अहवालात तर भारतात सर्वांत दरिद्री अशा दहा राष्ट्रांना स्थान दिले होते. या दरिद्री राष्ट्राच्या यादीत सर्वात दरिद्री राष्ट्र म्हणून भूतान तर दुसरा क्रमांक बांगला देश व चीन, पाकिस्तान व श्रीलंकेच्या पेक्षा भारताचा दरिद्री लोकसंख्येच्या बाबतीत वरचा क्रमांक लागतो.

भारत हा महासत्ता देश होण्याचा मार्ग शोधत आहे. तर प्रथम प्राथमिक गरजाच्यासाठी सामाजिक न्याय व मानवी जीवनातील गरजाच्यासाठी सामाजिक न्यास व मानवी जीवनातील कल्याणता, सुरक्षितता व मानवता याच्या मानवी मूल्याची जपवणूक करून जाणीव जागृती करणे हीच वर्तमान व भविष्य काळाची गरज आहे. तरच देश हा खरा बहुजन हिताय, बहुजनसुखाय, व सुजलाम सुफलाम होईल.

**भारतातील दारिद्र्यांची कारणे :**

दारिद्र्य ही एक जटिल समस्या आहे. परंपरागत व आधुनिक विचार प्रवाह सामाजिक व्यवस्थेच्या कार्य प्रणालीलाच दारिद्र्य मानतो.

**कार्ल मार्क्सच्यामते :** कामगाराचे भांडवलदारा कडून होत असणारे शोषण.

**माल्थसच्या मते :** गणिती पध्दतीने वाढत जाणारे अन्नधान्य उत्पादन व भूमितीय पध्दतीने वाढत जाणारी लोकसंख्या हेच दारिद्र्याचे महत्वाचे कारण मानतो.

**हेन्री जॉर्जच्यामते :** जमिनीवर असणारी व्यक्तीची व्यक्तीगत मालकी अगर मक्तेदारी हेच दारिद्र्याचे कारणे गिलीन आणि गिलीन यांनी प्रमुख कारणे सांगितलेली आहेत. १) व्यक्तीची अकार्यक्षमता २) प्रतिकूल भौतिक वातावरण ३) आर्थिक घटक

याशिवाय भारतातील सामाजिक, आर्थिक, राजकिय संरचनेमूळे व विशेष ककारणे दारिद्र्याच्या समस्यासाठी जबाबदार आहे.

**१) सामाजिक कारणे :**

अ) संयुक्त कुटूंब पध्दती, ब) जाती व्यवस्था, क) सामाजिक रूढी, परंपरा, ड) गलिच्छ वस्ती,
इ) निरक्षरता

**२) व्यक्तिगत कारणे :**

अ) आजारीपणा, ब) मानसिक आजार, क) वाईट सवयी, अपघात.

**३) आर्थिक कारणे :**

अ) शेती व्यवसायाची वाईट अवस्था ब) नैसर्गिक साधनाचा कमी उपयोग क) मूलभूत उद्योगाची वाईट परिस्थीती ड) बेरोजगारी इ) संपत्ती व उत्पन्न वाटपातील विषमता प) कमी बचत भ) परिवहन आणि संचाराच्या प्रगत साधनाची कमतरता म) बँक व पत सोयीची कमतरता.

**४) लोकसंख्यात्मक घटक :**

**५) राजकीय घटक**

**दारिद्र्याचे दुष्परिणाम :**

१) भ्रष्टाचार २) अपराध ३) बाल अपचारिता ४) घटस्पोट ५) आत्महत्या ६) वेश्यावृत्ती ७) शिक्षवृत्ती ८) स्वार्थी प्रवृत्तीस प्रोत्साहन

**दारिद्र्य निवारणार्थ प्रभावीउपाय :**

१) रोजगार निर्माण करणे, २) वितरणात समानता, ३) कृषिक्षेत्राचा विकास, ४) लोकसंख्या नियंत्रीत करणे, ५) काळा पैसा समाप्त करणे, ६) योजनाचे विभेद्री करण, ७) अर्थ संकल्पात परिवर्तन, ८) यंत्रज्ञान व तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे, ९) महिलांना आत्म निर्भर बनविणे, १०) पंचायत संस्था, ग्रामीण विकास, शहरी योजना व NGO ची मदत घेणे.

**दारिद्र्य निवारणार्थ शासकीय उपाय योजना :**

१) एकात्मिक ग्रामीण विकास योजना, २) राष्ट्रीय युवक स्व-रोजगार प्रशिक्षण योजना, ३) ग्रामीण रोजगार योजना, ४) जवाहर रोजगार योजना, ५) राजीव गांधी आरोग्य योजना, ६) न्युनतम आवश्यक योजना, ७) गरीबी आणि बेरोजगारी हटाव योजना, ८) रोजगार हमी योजना, ९) महिला बचत गट योजना, १०) विशेष व विविध लाभार्थी योजना.

**निष्कर्ष -**

भारत सरकारच्या नियोजन आयोगाने सुप्रीम कोर्टात नुकत्याच सादर केलेल्या दारिद्र्य रेषेबद्दलच्या ॲफिडेव्हिट मूळे देशभरात गदारोळ उडाला आहे. आपल्या देशाला दारिद्र्याचे मोजमाप करण्याची कार्यपध्दती Methodology १९७० च्या दशकापासून विकसीत होत आलेली आहे. सुरूवातीच्या काळात प्रा.वि.म. दांडेकर आणि प्रा. रथ या दोन ख्यातनाम अर्थात ज्ञानी कैलरीजवर आधारीत पध्दती मांडली प्रा. लकडावाला याचा सुधारित फॉर्म्युला स्विकारण्यात आला. १९९३ साला पासून दरपाच वर्षाच्या अंतराने नियोजन आयोगाने या कार्यपध्दतीवर अनेक तांत्रिक आक्षेप घेतले. प्रा. तेंडुलकरांनी कॅलरीज कार्यपध्दती नाकारले. व नवीन फॉर्म्युला नियोजन आयोगाने स्विकारला दारिद्र्य रेषेखालील असण्यासाठी दरमाणसी खर्च किती होता. तो होता शहरी भागासाठी २० रूपये (महिन्याला सुमारे ५७९ रूपये) ग्रामीण १५ रूपये महिन्याला ४४७ रूपये) सुप्रीम कोर्टाने आदेश दिला तो, या खर्चाच्या रकमा महागाई निर्देशांकाप्रमाणे वाढवून देण्यात यावे. २००९-२०१० सर्व्हेवर आधारीत शहरी भागासाठी २० रूपय्या वरून ३२ रूपये दरमहा ९६५ रूपये आणि ग्रामीण भागासाठी १५ रूपयावरून २६ रूपयापर्यंत दरमहना ७८१ रूपये वाढविले आहे. मंत्रालय निकर्षातील घोटाळे, चलाखी, बनवा बनवी यामुळे अर्थतज्ञ काय करतात हे गूढ निष्कर्ष काय असेल तर दारिद्र्याचे उपाय, सूचना, निर्मूलन करणे हे पी हळद हो गोरी असे नाही. जुनाट रोगासारखे ते शतकानु शतके भिनले आहे. एका शतकात निपटून काढणे शक्य नाही. त्यासाठी सतत प्रयत्न करणे, हे शासनाचे नाही तर समाजानेच प्रयत्नाची पराकाष्टा करणे आवश्यक आहे. असमानता दूर करण्यासाठी मानवतावादी मूल्यांचा स्विाकार करणे ही काळाची गरज आहे.

मानवी हक्क हे जीवन जगण्याचा अधिकार देते तर सामाजिक जीवनाचा नैतिक मापदंड म्हणजे न्याय १० डिसेंबर १९४८ मध्ये मानवी हक्क म्हणजे भय व भेद मुक्त असे जीवन जगण्याचा हक्क होय. मानवी हक्क हे प्रत्येकासाठी समान आहेत.

जगा व जगवा !

**संदर्भसूची**


१) भारतीय अर्थव्यवस्था - डॉ.सौ. स्मिता कोंडेवार

२) समकालीन भारतातील सामाजिक समस्या - प्रा. जयंत घाटगे

३) भारतीय समाज संरचना आणि समस्या - डॉ. प्रदीप आगलावे

४) मानवी हक्क आणि सामाजिक न्याय - प्रा. पी.के. कुलकर्णी

५) विकासाचे अर्थशास्त्र व पर्यावरण - डॉ. विश्वास कदम

६) योजना (नियोजन व विकास) - मे. २००२

७) वृतपत्र - दै. लोकमत - १८ सप्टेंबर २०११